# जाहीर आवाहन

उस्मानाबाद जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थती विचारात घेता गाळपेर क्षेत्रावर चारा पिकांचे उत्पादन करून जनावरांसाठी चारा उत्पादन करावयाचा आहे.

जलसंपदा, मृद व जलसंधारण विभागकडील जलाशयाखालील/तलावाखालील जमीन शेतकऱ्यांना चारा पिके उत्पादनाकरिता वर्ष २०१८-१९ मधील रब्बी व उन्हाळी हंगामासाठी नाममात्र रु १/-दराने अटी व शर्तीच्या अधीन राहून संबंधित विभागाकडून भाडेपट्ट्यावर देण्यात येणार आहे. गाळपेर जमिनीमध्ये जनावरांसाठी सुयोग्य अशी वैरण व चारा पिके (उदा. ज्वारी, मका इ ) घेण्यात यावी. यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत बियाण्याची विनामुल्य उपलब्धता करून देण्यात येणार आहे.

या पद्धतीने उत्पादित केलेला चारा शेतकऱ्यांच्या स्वतःच्या पशुधनाकरिता उपयोगात आणता येईल व अतिरिक्त चारा शिवारातील इतर दुग्धउत्पादक शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करून द्यावयाचा आहे.

गाळपेर क्षेत्रात चारा लागवड करण्यासाठी प्रकल्पनिहाय लाभार्थ्यांची निवड खालील अग्रक्रमाने करण्यात येईल.

१. ज्या व्यक्ती किंवा व्यक्तीच्या जमिनीचे नवीन तलाव, उपलब्ध बांधे, बांध इत्यादी बांधण्यासाठी संपादित करण्यात आलेली आहे अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती
२. स्थानिक भूमिहीन मागासवर्ग आणि अन्य लोक यांच्या संमिश्र सहकारी संस्था मात्र त्यात मागासवर्गीय सदस्यांची संख्या अधिक असली पाहिजे
३. स्थानिक भूमिहीन मागासवर्गीय लोकांच्या सहकारी संस्था
४. अन्य स्थानिक भूमिहीन लोकांच्या सहकारी संस्था
५. स्थानिक भूमिहीन मागासवर्गीय लोक
६. अन्य जमातीचे स्थानिक भूमिहीन लोक
७. बाहेरील भूमिहीन लोक
८. स्थानिक भूधारक
९. उपरोक्तपैकी कोणतेही लाभार्थी उपलब्ध न झाल्यास गावातील जास्त पशुधन असलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल
१०. सदर योजनेचे अर्ज दिनांक २४/११/२०१८ ते ४/१२/२०१८ पर्यंत संबंधित पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती येथे स्वीकारले जातील
११. सदर योजनेतील लाभार्थी निवड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येणार आहे
१२. सदर योजनेचा अर्ज व योजनेअंतर्गत समाविष्ट जलाशयाखालील/तलावाखालील क्षेत्राची यादी संबंधित पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती यांच्याकडे पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अधिकच्या सविस्तर माहितीसाठी संबंधित पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा.

तरी, सदर योजनेमध्ये जास्तीत जास्त शेतकरी/संस्थांनी सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त उस्मानाबाद करत आहेत.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
उस्मानाबाद